
५) कविता - शिर्षक - जागत्या जागी



गरगरगर फिरणारा पंखा
स्तब्ध आहे जागत्या जागी
खुर्च्या आतल्या खाली खाली।
एकाकी झालीय आताशा खोली ॥

माणसे घरातली नाही एका जागी
होते ते, झाली झाली पांगापांगी
उजाड भकास होऊन बसले हे
भरलेले घर आता जागत्या जागी ॥

हश्या - टाळ्यां, मुक्त ते बागडणे
सुख - दुःखाच्या आठवणी सोबत्या
मानवतीच्या जणू गर्द सावल्या
जुने दिवस थिजले जागत्या जागी ॥

सांभाळता येत नाही संचित मन
मोल त्याचे कधी उमजत नाही
वेळ होतो पसार हळू मांजरपावली
क्षण थिजलेले तैसेच जागत्या जागी ॥

—o—


- कवी -
अरुण वि. देशपांडे
पाटील नगर, बावधन (बु), पुणे-२१,
मोबा. - 9850177342